क्रमांक : मुंमप्रविप्रा/बैठक/६१

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समूह, प्लॉट क्र. सी-१४ व
वांद्रे [पूर्व], मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २६ फेब्रुवारी, १९९२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २२ जानेवारी, १९९२ रोजी झालेल्या ६१व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

२. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्यात ही विनंती.

[श्र. वि. आसगांवकर]
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य,

निमंत्रित :
शासनाचे सचिव [२]
नगर विकास विभाग
मंत्रालय.

प्रत अग्रेषित :
विधी सल्लागार, मुं. म. प्र. वि. प्रा.
प्राधिकरणाचे अधिकारी

No. BMRDA/MTG/61.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Plot Nos. C-14 & C-15,
Bandra Kurla Complex,
Bandra (East),
BOMBAY - 400 051.

Date : 26th February, 1992.

The minutes of the 61st meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 22nd January, 1992 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

S. Asgaonkar 25/2/92.
( S. V. ASGAONKAR )
SECRETARY,
EXECUTIVE COMMITTEE.

To :

All Members.

INVITEE :

The Secretary (II) to the Government of Maharashtra, Urban Development Department, Mantralaya.

Copy to :-

The Legal Adviser, B.M.R.D.A.

Officers of B.M.R.D.A.

N REGION
ITY,
-15,
ex,

ary, 1992.

ay

ne

eir

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
६१व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : २२ जानेवारी, १९९२ [बुधवार]

वेळ : संध्याकाळी ५–३० वाजता

सभास्थान : मा. नगर विकास मंत्री यांच्या कार्यालयातील समिती कक्ष [खो. क्र. ३१३], तिसरा मजला, मंत्रालय.

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री. सुशिलकुमार शिंदे, नगर विकास मंत्री | – | अध्यक्ष |
| श्री. र. छो. अंकलेश्वरीया, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्य |
| श्रीमती इंदुमती त्रि. पटेल, नगरसेविका, बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्या |
| श्री. भगवंतराव अ. पाटील, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्य |
| श्री. प्रभाकर ना. धारकर, विधान परिषद सदस्य | – | सदस्य |
| श्री. श. गं. काळे, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्य |
| श्री. डी. टी. जोसेफ, शासनाचे सचिव [एक] नगर विकास विभाग | – | सदस्य |
| श्री. बा. कृ. अग्रवाल, शासनाचे सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | – | सदस्य |
| श्री. आर. सी. सिन्हा, व्यवस्थापकीय संचालक, सिडको | – | सदस्य |
| श्री. पी. सुब्रह्मण्यम, महानगर आयुक्त, मुं. म. प्र. वि. प्राधिकरण. | – | सदस्य–सचिव |

बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या मागील [६०व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

[कृ. मा.

बाब क्र. २ : प्राधिकरणाच्या मागील [६०व्या] बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही.

यानंतर, प्राधिकरणाने कार्यवृत्तावरील कार्यवाहीची नोंद घेतली.

बाब क्र. ३ : कल्याणच्या विकास आराखड्यात जागा क्र. ५० बाबत किरकोळ फेरबदल.

३.१ या बाबीवर चर्चा चालू असताना, बाब टिप्पणीत जोडपत्र म्हणून जोडलेल्या शासकीय पत्रामधील नमूद केलेल्या कारणांपैकी एक म्हणजे विकास आराखडा पक्का करण्यात मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाने बराच विलंब लावला या कारणाचा निर्देश करण्यात आला. या संबंधात, सचिव [१] नगर विकास विभाग यांनी असे स्पष्ट केले की, संबंधित व्यक्तीच्या/संस्थेच्या विनंतीत कितपत तथ्य आहे हे विचारात घेऊन शासनाने, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये आदेश दिले आहेत.

३.२ त्यानंतर प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करून पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४९१ :

"ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४०[१][सी] खालील तरतुदीनुसार शासन निर्णय क्रमांक टीपीबी/१२७५/११९१/युडी-८ दिनांक १५ मार्च, १९७६ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची कल्याण समूह अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे आणि त्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ११३[८] खालील तरतुदीनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास नियोजन प्राधिकरण म्हणून कार्य करणे बंधनकारक आहे.

"आणि ज्याअर्थी, विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात भूतपूर्व कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ नगर परिषदा आणि उल्हासनगर नगरपालिकेचे क्षेत्र समाविष्ट करण्यात आले आहे.

"आणि ज्याअर्थी, कल्याण नगरपालिकेने तिचे पत्र दिनांक १८ मे, १९८० अन्वये सदर प्राथमिक शाळेचे आरक्षण जागा क्र. ५० रद्द करण्यास संमती दिली.

...3/-

"आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७ खालील तरतुदीनुसार कल्याणच्या मंजूर विकास आराखडयामधील जागा क्रमांक ५० मध्ये किरकोळ फेरबदल करण्याचे आदेश दिले.

"आणि म्हणून आता, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३[८] अन्वये खालील अधिकारांचा वापर करून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कल्याणच्या मंजूर विकास आराखडयामध्ये जागा क्र. ५० वरील प्राथमिक शाळेसाठीचे आरक्षणात किरकोळ फेरबदल करण्याचे ठरवित आहे.

"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ खाली प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा व या बाबतीतील इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात आणि दोन पेक्षा कमी नाही इतक्या स्थानिक वर्तमानपत्रातून वरील प्रस्तावित फेरबदलाबाबत अधिसूचनेच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्यापेक्षा अधिक नाही इतक्या कालावधीत, जनतेच्या हरकती व सूचना मागविण्याच्या अधिसूचनेस प्राधिकरण मान्यता देत आहे.

"आणि असाही ठराव करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम १३९ तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम ७[अ] खालील अधिकारांचा वापर करून, ही अधिसूचना प्रसिध्द करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देण्यात येत आहेत.

"असेही ठरविण्यात आले की, उक्त अधिनियमाच्या कलम १५१[३] खालील तरतुदीतील अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे असा आदेश देत आहे की, या बाबतीत ज्या सूचना/हरकती स्विकृत होतील त्यावर महानगर आयुक्त किंवा महानगर आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला अधिकारी जो वरिष्ठ नियोजक या दर्जापेक्षा कमी नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने विचार करावा आणि सूचना/हरकती सादर करणाऱ्या व्यक्तिचे म्हणणे ऐकून घेतल्यावर त्यांना आपला अहवाल प्रस्तावित फेरबदलासह उक्त अधिनियमाच्या कलम ३७ खालील तरतुदीनुसार राज्य शासनास अंतिम मंजूरीसाठी पाठवावा."

बाब क्र. ४ : मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीला कृषि उत्पन्न वस्तूंचे घाऊक बाजार मुंबई शहरातून नवीन मुंबई येथे स्थलांतरीत करण्याच्या टप्पा-२ मधील बांधकाम हाती घेण्यासाठी रु. १६ कोटीचे कर्ज मंजूर करणेबाबत.

---

४.१ बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करताना, पुढील मुद्यासंबंधीचा तपशीलवार अहवाल तयार करून तो प्राधिकरणापुढे ठेवावा अशी सूचना प्राधिकरणाने केली :-

अ] मुंबई बेट शहरातील दाटी कमी करण्याच्या धोरणास चालना

दे. यासाठी, विशेषत: घाऊक बाजार हलविल्यानंतर त्याचा या शहराच्या परिस्थितीवर होणारा प्रत्यक्ष परिणाम या दृष्टीने, कोणकोणत्या उपाययोजना आजवर हाती घेण्यात आल्या, आणि

ब] दाटी कमी करण्याच्या बाबतीत अधिक परिणामकारक अशा कोणत्या उपाययोजना आता हाती घ्याव्या लागणार आहेत.

४.२ त्यानुसार प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ४९२ :

"असा ठराव करण्यात येतो की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम [१] चे पोटकलम [जी] अन्वये तसेच या संबंधात देण्यात आलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करून प्राधिकरण बाब टिप्पणीतील परिच्छेद ८ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींना अधीन राहून मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीस १६ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देत आहे.

"पुढे असाही ठराव करण्यात येतो की, मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती बरोबर योग्य तो करारनामा करण्यास व बाब टिप्पणीच्या परिच्छेद ८ मध्ये उल्लेख केल्यानुसार कर्जाचे वाटप करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. ५ : वित्त सल्लागाराचे पद रद्द केल्यामुळे विनियमात सुधारणा

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ४९३ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ११ चे पोटकलम [२] व कलम ५० अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या [illegible] एक, दोन, व तीन मध्ये तपशीलवार दिल्याप्रमाणे पुढील विनियमांमध्ये सुधारणा करीत आहे :-

१. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [कर्मचारी अंशदायी भविष्य निर्वाह निधी] विनियम, १९७९.

२. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [वित्तीय] विनियम, [illegible]

...५/-

३. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्थावर संपत्ती समिती [रचना व अधिकार] विनियम, १९७७".

बाब क्र. ६ : वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी, कनिष्ठ परिवहन नियोजन व नियोजन सहाय्यक या पदांची सुधारीत वेतनश्रेणी

६.१ या बाबीवरील चर्चा चालू असताना असे सुचविण्यात आले की, कार्यक्षम कर्मचा-याना विशेषत: तांत्रिक कर्मचारीवर्ग यांना आकर्षित करण्यासाठी व असे कर्मचारी दिर्घकाल सेवेत राहण्यासाठी म्हणून त्यांना अधिक चांगल्या सेवा शर्ती देण्याबाबत विचार करण्यात यावा आणि आवश्यक तो प्रस्ताव प्राधिकरणापुढे विचारार्थ ठेवावा.

६.२ त्यानंतर प्राधिकरणाने विषय टिप्पणीमधील प्रस्ताव मान्य केला आणि पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ४९४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं. म. प्र. वि. प्रा. अधिनियम, १९७४ च्या कलम ११ च्या उपकलम [२] अन्वये आणि त्याच अधिनियमाच्या कलम ५० खाली प्रदान केलेल्या अधिकारान्वये तयार केलेल्या मुं. म. प्र. वि. प्रा. [सेवेच्या शर्ती] विनियम, १९७७ च्या विनियम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, प्राधिकरण पुढील ३ पदांच्या वेतनश्रेणी सुधारणेस मंजूरी देत आहे.

| अनु-क्रमांक | पदनाम | सुधारीत वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १. | वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी | रु. ३२००-१००-३५००-१२५-४६२५. |
| २. | कनिष्ठ परिवहन नियोजक | रु. २०००-६०-२३००-द. रो.-७५-३२००-१००-३५००. |
| ३. | नियोजन सहाय्यक | रु. १४००-४०-१८००-द. रो. ५०-२३०० |

"असाही ठराव करण्यात येत आहे की, ठराव क्र. ४२३, दिनांक ३१ मार्च, १९९० मधील सर्व अन्य तरतुदी, प्रस्तावित केल्याप्रमाणे उपरोक्त तीन संवर्ग पदांच्या वेतनश्रेणी सुधारणेस लागू राहातील."

[कृ. मा. प.]

बाब क्र. ७ : माहीम निसर्ग उद्यान - व्यवस्थापन आणि देखभाल

चर्चेनंतर, प्राधिकरणाने राज्य शासनाकडे विचारार्थ पाठवावयाच्या कार्यकारी समितीच्या पुढील शिफारशींना मान्यता दिली :

१. राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने संस्था नोंदणी अधिनियम, १९६० अन्वये नगर विकास विभागाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली संस्था स्थापन करावी.

२. नियमित संस्था स्थापन होईपर्यंत राज्य शासनाने अंतरिम नियामक मंडळ स्थापन करण्यासंबंधीचे प्रशासनिक आदेश द्यावेत.

३. प्रस्तावित संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष, महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव हे असावेत आणि राज्य शासनाच्या संबंधित प्रशासनिक विभागाचे सचिव आणि संबंधित संस्थांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा सदस्य म्हणून समावेश करावा.

बाब क्र. ८ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचा-यांच्या अल्पोपहार भत्त्यामध्ये सुधारणा

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ४२५ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ४-अ[२][अ] सह कलम ४६-क या अन्वये प्राधिकरण याद्वारे मु. म. प्र. वि. प्राधिकरणाचे कर्मचारी व अधिकारी यांना अल्पोपहार भत्ता, त्यात वेळोवेळी होणा-या सुधारणेसहीत, देण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. त्याचबरोबर महानगर आयुक्तांना या प्रयोजनासाठी योग्य वाटेल अशा मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाच्या अन्य कोणत्याही अधिका-याकडे हे अधिकार पुन्हा सोपविण्यास प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र. ९ : वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉक मधील जमिनीचे घाऊक कापड बाजारासाठी वितरण

[प्रलंबित बाब]

चर्चेनंतर, या बाबीचा विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

बैठक समाप्त करण्यापूर्वी अध्यक्षांनी असे सांगितले की, विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [मुं. म. प्र. वि. प्रा.] आणि स्थानिक प्राधिकरण म्हणून कल्याण महानगरपालिका, या दोन

....७/-

संस्था विकासाच्या कामाशी निगडीत असल्याने विकास कामांना परवानगी देताना अडचणी निर्माण होतात. या परिस्थितीमुळे जुन्या नगरपालिका क्षेत्रात व त्यांच्या सभोवताली अनधिकृत विकास झाला आहे. अध्यक्षांनी पुढे असेही सांगितले की, पनवेल वगैरेसारख्या नागरी क्षेत्राच्या सभोवतालचा नागरीकरणाचा संपूर्ण भार विचारात घेऊन "जी" झोनच्या तरतुदी नव्याने सुधारल्या पाहिजेत. म्हणून या विषयावर तपशीलवार टिप्पण्या प्राधिकरणाच्या यानंतरच्या बैठकीमध्ये ठेवण्यात याव्यात अशी अध्यक्षांनी सूचना केली.

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

-----

# MINUTES OF THE 61ST MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY.

DATE : 22nd January, 1992. (Wednesday)

TIME : 5.30 P.M.

PLACE : Committee Room (No.313) in the Office of the Hon'ble Minister for Urban Development, 3rd Floor, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri Sushilkumar Shinde, Minister for Urban Development. | - Chairman |
| Shri R.C. Ankleswaria, Councillor, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Smt. Indumati T. Patel, Councillor, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri Bhagwantrao A. Patil, Councillor, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri Prabhakar N. Dharkar, M.L.C. | - Member |
| Shri S.G. Kale, Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri D.T. Joseph, Secretary (I) to the Govt. of Maharashtra, Urban Development Department. | - Member |
| Shri B.K. Agarwal, Secretary to the Govt. of Maharashtra, Housing & Special Assistance Deptt. | - Member |
| Shri R.C. Sinha, Managing Director, C.I.D.C.O. | - Member |
| Shri P. Subrahmanyam, Metropolitan Commissioner, B.M.R.D.A. | - Member-Secretary |

Item No. 1 : Confirmation of the minutes of the last (60th) meeting of the Authority.

The minutes were confirmed.

......2/-

Item No. 2 : Action taken on the minutes of the last (60th) meeting of the Authority.

After discussion, the action taken report was notad by the Authority.

Item No. 3 : Minor modification to the Development Plan, Kalyan, in respect of Site No.50.

3.1. During the course of discussion on this Item, a reference was made to one of the reasons mentioned in the Government letter appended as Annexure to the Item Note that BMRDA took long time to finalise the Development Plan. The Secretary (I), UDD clarified in this behalf that Government, after taking into account the merits of the request of the Party, issued directives under Section 37 of the MRTP Act, 1966.

3.2 The Authority then approved the proposal contained in Item note and passed the following Resolution :

RESOLUTION NO. 491 :

" Whereas BMRDA is appointed as Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area as per Govt. Resolution No.TPB/1275/1191/UD-8 dated 15th March, 1976 under the provisions of Section 40(1)(c) of MR&TP Act, 1966 and whereas it is obligatory on BMRDA to perform the functions of Planning Authority under the provisions of Section 113(8) of MR&TP Act, 1966;

" And whereas the area of erstwhile Municipal Councils for Kalyan, Dombivali, Ambernath and Municipal limits of Ulhasnagar are included within the jurisdiction of Special Planning Authority;

" And whereas the Kalyan Municipal Corporation by its letter dated 18th May, 1990 has consented to delete the reservation of Primary School bearing site No.50;

" And whereas the Govt. of Maharashtra has directed to initiate minor modification to the sanctioned Development Plan of Kalyan in respect of reservation in site No.50 under the provisions of Section 37 of MR&TP Act, 1966;

" Now, therefore, in exercise of the powers contained in Section 113(8) of MR&TP Act, 1966, BMRDA resolves to initiate minor modicication to the sanctioned Development

....3/-

Plan of Kalyan to delete the reservation in respect of site No.50 for primary school.

" Resolved further that the Authority do in exercise of powers under Section 37 of the said Act and all other powers enabling it in this behalf approve of a notice being published in the Maharashtra Government Gazette and in not less than two local newspapers inviting objections and suggestions from the public with respect to such modification not later than one month from such notice.

" Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 139 of the said Act read with Section 74 of the BMRDA Act, 1974 authorise the Metropolitan Commissioner to publish the Notice and in accordance with the foregoing clauses.

" Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 151(3) of the said Act direct that the Metropolitan Commissioner or the officer appointed by the Metropolitan Commissioner not below the rank of Senior Planner shall consider the objections and suggestions which may be received in this behalf and after giving hearing to the persons presenting objections/suggestions and shall submit the report to the State Govt. along with the proposed modification for final sanction under the provisions of Section 37 of the said Act."

Item No. 4 : Grant of loan amounting to Rs.16 crores to Bombay Agricultural Produce Market Committee - (BAPMC) for undertaking construction work in Phase-II of the shifting of Agricultural Commodities Wholesale Markets from Bombay City to New Bombay.

4.1 While approving the proposal contained in the Item note, the Authority desired that the detailed paper on the following points should be prepared and placed before the Authority :

a) Measures so far taken in furtherence of policy of decongesting Island city of Bombay, particularly in shifting wholesale markets and its real impact on the conditions in the Island city; and

b) Measures now required to be taken for achieving better results in respect of decongestion.

..4/-

4.2 The Authority then passed the following Resolution :

RESOLUTION NO. 492 :

" RESOLVED THAT in exercise of its powers conferred in clause (g) of sub-section (1) of Section 12 of the BMRDA Act, 1974 and all other powers enabling in this behalf, Authority hereby approves the proposal to grant an amount of Rs.16 crores to the BAPMC on the terms and conditions mentioned in para 8 of the Item note.

" RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner, BMRDA be and is hereby authorised to execute suitable Agreement with the BAPMC and to disburse loan as mentioned in para 8 of the Item note."

Item No. 5 : Amendment to the Regulations consequent upon the abolition of the post of Financial Adviser.

The Authority approved the proposal contained in the Item note and passed the following Resolution :

RESOLUTION NO. 493 :

" RESOLVED THAT in exercise of the powers conferred by sub-Section (2) of Section 11 read with Section 50 of the BMRDA Act, 1974, the Authority hereby amends the :

1. The BMRDA (Employees Contributory Provident Fund) Regulations, 1979,

2. The BMRDA (Financial) Regulations, 1976; and

3. The BMRDA Immovable Property Committee (Constitution and Powers) Regulations, 1977,

as detailed respectively in Annexures I, II and III enclosed to the Item note."

Item No. 6 : Revised pay-scales for the post of Senior Statistical Officer, Junior Transportation Planner and Planning Assistant.

6.1 During the course of discussion on this Item, it was suggested that for attracting and retaining competent personnel, especially the technical staff, making available better service conditions to such staff should be thought of and the necessary proposal be placed before the Authority for its consideration.

6.2 The Authority then approved the proposal contained in the Item note and passed the following Resolution :

RESOLUTION NO. 494 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred by sub-Section (2) of Section 11 of the BMRDA Act, 1974 and Regulation 3 of the BMRDA (Conditions of Service) Regulations, 1977 framed by it under the powers conferred under Section 50 of the said Act, the Authority accords sanction for the revision of scales of pay of the following 3 posts :-

| Sr. No. | Designation of the post | Revised pay-scale |
|---|---|---|
| 1. | Senior Statistical Officer | Rs.3200-100-3500-125-4625. |
| 2. | Junior Transportation Planner | Rs.2000-60-2300-EB-75-3200-100-3500. |
| 3. | Planning Assistant | Rs.1400-40-1800-EB-50-2300. |

" RESOLVED FURTHER THAT all other contents of Resolution No.423 dated 31st March, 1990 shall be applicable for revision of scales of pay of the above stated 3 cadres of posts, as proposed."

Item No. 7 : Mahim Nature Park - Management & Maintenance of.

After discussion the Authority endorsed the following recommendations made by the Executive Committee for consideration of the State Government :

i) That the State Government in the Urban Development Department may form a Society under Societies' Registration Act, 1860 directly under UDD of State Government.

ii) That pending formation of regular Society, State Government may issue administrative orders appointing an interim Governing Council.

....6/-

iii) Governing Council of the proposed Society may consist of the Chief Secretary to the Government of Maharashtra as its President and the Secretaries of the concerned administrative departments of the State Government and the Chief Executives of the concerned Organisations as its members.

Item No. 8 : Revision of Snacks Allowance to BMRDA employees.

The Authority approved the proposal contained in the Item note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.495 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under Section 46 C of the BMRDA Act, 1974 read with Section 4A(2)(a) thereof, the Authority hereby delegates its powers to the Metropolitan Commissioner regarding grant of snacks allowance to employees and officers of the BMRDA, including its revision from time to time, with an authority to redelegate these powers further to any officer of the BMRDA as he may deem fit for the purpose."

Item No. 9 : Allotment of land for Wholesale Textile Market in 'G' Block of Bandra-Kurla Complex. (Deferred item)

After discussion, further consideration of the Item was deferred.

Before concluding the meeting the Chairman observed that dual agencies viz. the Bombay Metropolitan Region Development Authority (BMRDA) as Special Planning Authority (SPA) and the Kalyan Municipal Corporation as Local Authority, create difficulties in obtaining development permissions. This situation has resulted into unauthorised development in and around the old municipal areas. The Chairman further observed that considering the total pressure of urbanisation around

....7/-

urban areas such as Panvel, etc., 'G' Zone provisions be revised afresh. The Chairman, therefore, desired that detailed notes on these subjects be brought before the Authority in its subsequent meeting.

The meeting then terminated with a vote of thanks to the Chair.

-.-.-.-.-.-.-.-.-.-